# द सरस्वती सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.

पत्ता :- ८१९-अे,भवानी पेठ,पुणे:-४

नोंदणी क्र.:- बी-३०५६,दिनांक:-१४-११-१९६०.

दिनांक:-१०/११/२०२३

## पुनर्विकास विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

द सरस्वती सहकारी गृहरचना संस्थेच्या इमारतींच्या पुनर्विकासा संदर्भात, विकासकांचे सादरीकरण बाबत दिनांक १५.१०.२०२३ आणि ०५.११.२०२३ रोजी दुपारी ठिक १२.३० ते दुपारी ०६.०० या वेळेस हॅलो स्टुडिओ इस्टीक, अमर अविनाश कॉर्पोरेट प्लाझा,बंडगार्डन रोड, पुणे. ४११ ००१. येथे आयोजित करण्यात आली होते. संस्थेचे पुनर्विकास प्रकल्प संस्थेचे सल्लागार श्री.विजय ओसवाल यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले आणि त्यानंतर विकासकांना सादरीकरण करण्यासाठी अनुमती देण्यात आली.

**विषय क्रमांक ०१:-** एकूण ०८ विकसकांनी टेंडर प्रेझेंन्टेशन बाबतीत सादरीकरण करणे.

**ठराव क्रमांक ०१:-** संस्थेसाठी निवड केलेल्या एकुण ०८ विकसकांपैकी दिनांक १५.१०.२०२३ रोजी ०५ विकसकांना निविदा सादरीकरणासाठी आमंत्रित केले होते. प्रत्येक विकसकाला एकुण ४५ मिनिटांचा स्लॉट देण्यात आला होता त्याप्रमाणे प्रत्येक विकसकाने आपाआपले टेंडर शिस्तबध्दरित्या सादरीकरण केले.

सर्वात प्रथम मेसर्स.फ्लाय निर्वाणाचे श्री.यश पवार आणि त्यांची टिम यांनी आपले प्रेझेंन्टेशन सादर केले संपुर्ण कंपनी संदर्भात माहिती देऊन आपल्या संस्थेसंदर्भातील टेंडर प्रेझेंन्टेशन मध्ये जी ऑफर दिली होती त्यासंदर्भात सादरीकरण केले सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देखील समाधानकारक देण्यात आले.

त्यानंतर मेसर्स. सुखवानी बिल्डटेक या कंपनीने यांनी त्यांच्या कंपनीची सुरूवात कशा स्वरूपात चालु करून त्याचा वटवृक्ष कशा पध्दतीने उभा केला आहे याबद्यलची माहिती, जी संस्थेकडे ऑफर भरून देण्यात आली त्याबद्यल सविस्तर माहिती आणि त्यांनी कोणत्या

भागामध्ये किती स्क्वे.फुटाचे काम केले आहे यासदंर्भातील माहिती सभासदांना दिली. त्यानंतर सभासदांचे प्रश्न-उत्तराचेही देखील योग्य पध्दतीने निरसन केले.

त्यानंतर संस्थेतील प्रत्येक सभासदाचे कुटुंब यांची भोजनाची सोय केली होती सर्वांनी त्या भोजनाचा आस्वाद घेतला.

भोजनानंतर तिसरे विकसक मेसर्स.मेनलॅंड स्पेसचे सीईओ. विजय सामंत आणि त्यांची टिम यांनी संस्थेला ऑफर किंवा जे टेंडर भरून दिले होते त्यासंदर्भात माहिती दिली.त्यांनी कोणत्या भागामध्ये किती लाख स्क्वे.फुटाचे काम केले आहे यासदंर्भातील माहिती सभासदांना दिली. त्यानंतर सभासदांचे प्रश्न-उत्तराचेही देखील योग्य पध्दतीने निरसन केले.

त्यानंतर चौथे विकसक मेसर्स.बी.यु.भंडारी टिम यांनी उपस्थित असलेल्या सभासदांचे स्वागत करून त्यांनी त्यांच्या कंपनीसंदर्भात माहिती देऊन त्याचे संपुर्ण प्रेझेंन्टेशन सादर करून सभासदांचे प्रश्न-उत्तराचेही देखील योग्य पध्दतीने निरसन केले.

त्यानंतर मेसर्स. रानावत इन्फ्राचे श्री.विशाल जैन आणि त्यांची टिम हे उपस्थित होत. रानावत इन्फ्राची सुरूवात ते आपल्या बिल्डींगमध्ये त्यांनी काय वेगळेपण दिले आहे त्याचा सविस्तर वृत्तांत मांडला त्यानंतर श्री.विशाल जैन यांनी आम्ही तुम्हाला यामध्ये अजुन काय छान देऊ शकतो यावर सुध्दा त्यांनी सांगितले आणि सभासदांचे प्रश्न-उत्तराचेही देखील योग्य पध्दतीने निरसन केले.

दिनांक ०५.११.२०२३ रोजी ०३ विकसकांना निविदा सादरीकरणासाठी आमंत्रित केले होते. प्रत्येक विकसकाला एकुण ४५ मिनिटांचा स्लॉट देण्यात आला होता त्याप्रमाणे प्रत्येक विकसकाने आपाआपले टेंडर शिस्तबध्दरित्या सादरीकरण केले.

त्यानंतर मेसर्स. कुमार प्रॉपर्टिजचे श्री.मिलन महाजन आणि त्यांची टिम यांनी त्यांच्या कंपनीला सुरूवात करण्यापुर्वी त्यांचा प्रथम व्यवसाय कोणता होता आणि त्यांनी नंतर कन्सट्रक्शन या व्यवसायाला कशा पध्दतीने सुरूवात करून ते आता किती लाख स्क्वे.फुटाचे

काम आणि कोणत्या भागामध्ये ते काम करीत आहे त्यानंतर या व्यवसायाला ते स्वत:चे कसे फंडिग उभारू शकतात त्याची माहिती दिली त्यानंतर रोडसंदर्भातील प्रश्न किंवा जी ऑफर त्यांनी दिली त्या संदर्भात माहिती दिली सभासदांचे प्रश्न-उत्तराचेही देखील योग्य पध्दतीने निरसन केले.

त्यानंतर मेसर्स. भैरव प्रमोटर्सचे श्री.रोहन दुधेडिया आणि हर्षवर्धन पुंगलिया त्यांची टिम यांनी त्यांच्या कंपनीसंदर्भात माहिती देऊन एक ले-आऊट सादर केला किती मजली बिल्डिंग असेल, ॲमिनिटीज काय काय असतील त्याचे संपुर्ण प्रेझेंन्टेशन सादर करून सभासदांचे प्रश्न-उत्तराचेही देखील योग्य पध्दतीने निरसन केले.

त्यानंतर संस्थेतील प्रत्येक सभासदाचे कुटुंब यांची भोजनाची सोय संस्थेमार्फत केली होती सर्वांनी त्या भोजनाचा आस्वाद घेतला.

त्यानंतर मेसर्स.श्री सोनिग्राचे चे सीईओ आणि त्यांची टिम यांनी आपले प्रेझेंन्टेशन सादर केले संपुर्ण कंपनी संदर्भात माहिती देऊन आपल्या संस्थेसंदर्भातील छान पध्दतीने टेंडर प्रेझेंन्टेशन सादर केले बिल्डींग कशा पध्दतीची असेल याचे त्यांनी एक वॉक थ्रु सुध्दा छान सादर केले. सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देखील समाधानकारक देण्यात आले.

सुचक:-सौ.रेणु गेहलोत अनुमोदक:-सौ.बिंदु शर्मा

**विषय क्रमांक ०२:-** वरील विकसकांबरोबर पुढील कार्यवाहीचे स्वरूप ठरविणे.

**ठराव क्रमांक ०२:-** एकूण ०८ विकसकांनी टेंडर प्रेझेंन्टेशन सादर केल्यानंतर संस्थेचे पुनर्विकास प्रकल्प संस्थेचे सल्लागार श्री. विजय ओसवाल यांनी सर्व विकसकांचे संस्थेच्या सभासदांच्या वतीने आभार मानले. सर्व विकसकांच्या बिल्डर साईट व्हिझिट करण्यासाठी प्रत्येकी २ साईट सभासदांना बघायच्या आहेत त्याप्रमाणे प्रत्येक बिल्डरला आधी एक आठवडाभर तसे कळवण्यात येईल असे सर्व सभासदांसमोर सांगितले. वरील ठरावाअंती श्री.विजय ओसवाल आणि त्यांची पुर्ण टिम यांचे पुनर्विकास समितीतर्फे आभार मानले.

सुचक :-श्री. जय शर्मा

अनुमोदक :-श्री. रमेश गोधवानी

<u>ठराव सर्वसंमत</u>

द सरस्वती सहकारी गृहरचना संस्थेच्या वतीने

अध्यक्ष सचिव खजिनदार